तरुण भारत बुधवार २५ जानेवारी २०२३

# दोडामार्ग हळबे कॉलेजमध्ये मराठी भाषा पंधरवडा दिन



**दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात कलाकार उदय पास्ते यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राध्यापक. समीर ठाकुर**

**दोडामार्ग :** प्रत्येक तरुणाला झटपट यश हवे असते. मात्र, त्यासाठी सर्वप्रथम आपली क्षमता ओळखून प्रत्येकाने ध्येय निश्चित केले पाहिजे. मनापासून शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षणाने आपल्या बुद्धीचा विकास होऊन आपल्या क्षमतांची जाणीव होते. न्यूनगंड नाहीसा होतो, असे प्रतिपादन 'रात्रीस खेळ चाले' या गाजलेल्या मालिकेतील नाथाची भूमिका साकारणारे व उद्योजक उदय पास्ते यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. प्रशांत ढेपे, डॉ. संजय खडपकर, प्रा. दिलीप बर्वे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून कविता वाचन स्पर्धेचे आयोजन केले होते. यात एकूण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन महिमा गवस यांनी तर आभार डॉ. प्रशांत ढेपे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आदींनी या मिमिक्रीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.